



दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● बुधवार १७ जूले २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३३५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये



गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
दैनिक वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077


# या गोष्टी खपवून घेतल्या जाणार नाहीत–पंकजा मुंडे

**काय म्हणाल्या पंकजा मुंडे? "मीच कधीकधी माझ्याकडून जमतील तसे गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानला पैसे देत असते. पण अशा आरोपांमुळे मी अत्यंत्य व्यथित झाले आहे. मी निवडणुकीतील विजयाचा आनंद जनतेसोबत साजरा करत होते. पण हा आनंद काही लोकांना पाहावला नाही. पूजा खेडकर यांच्या बातम्या अनेक दिवसांपासून चालू आहे. पण कालच काही लोकांना काय साक्षात्कार झाला की त्यांनी ठरवलं की हे पंकजा मुंडेंशी जोडायचंय", अशी प्रतिक्रिया मुंडे यांनी दिली. "कुणीतरी किरकोळ माणूस येऊन काहीतरी बोलतो. मागेही असंच झालं होतं. माझ्याविषयी बातमी झाली होती. तेव्हाही मी मानहानीचा दावा केला होता. कोणतीही खात्री न करता काही माध्यमांनी ही बातमी चालवली हे मी सहन करू शकत नाही. मी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानसाठी खेडकर यांच्याकडून एक रुपयाचा निधी घेतलेला नाही. माझा या सगळ्याशी काय संबंध आहे?" असा सवाल पंकजा मुंडेंनी उपस्थित केला.**





**वादळवार्ता/मुंबई**

आयएएस पूजा खेडकर प्रकरणाची गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. पूजा खेडकर यांनी आधी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात गैरवर्तन केल्यानंतर त्यांच्या कागदपत्रांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झालं असून त्यासंदर्भात सध्या चौकशी चालू आहे. त्यातच आता या प्रकरणाशी भाजपा नेत्या व विधानपरिषद सदस्य पंकजा मुंडे यांचं नाव जोडलं जाऊ लागलं आहे. यामुळे पंकजा मुंडे संतप्त झाल्या असून त्यांनी असा कोणताही संबंध नसल्याचं स्पष्टीकरण दिलं आहे. तसेच, असा आरोप करणाऱ्यांविरोधात कायदेशीर पाऊल उचलणार असल्याचंहीत्या म्हणाल्या आहेत. पंकजा मुंडेंचा पूजा खेडकर प्रकरणाशी संबंध? पूजा खेडकर त्यांच्या वर्तनामुळे व कागदपत्रांमुळे चर्चेत असताना त्यांच्या आई मनोरमा खेडकर पिस्तुल हातात घेऊन गावकऱ्यांना दमदाटी केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यामुळे चर्चेत आहेत. त्यात पंकजा मुंडेंनी पूजा खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर यांच्याकडून पैशांचा चेक स्वीकारल्याचा दावा केला जात आहे. पंकजा मुंडेंनी ट्रस्टसाठी हा चेक स्वीकारल्याचाही आरोप केला जात असताना त्यावर पंकजा मुंडेंनी टीव्ही ९ शी बोलताना तोंडसुख घेतलं आहे. तसेच, कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. "मी पंतप्रधानांपेक्षा मोठी आहे का?" दरम्यान, एखाद्या व्यक्तीला बोगसपणे आयएएस करण्याइतकी मी मोठी नाही, असं पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. "मी प्रीतम मुंडेंचं तिकीट वाचवू शकले नाही. मी स्वत: निवडून येताना माझी दमछाक झाली. असं असताना मी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पंतप्रधान यांच्यापेक्षा मोठी आहे का की एखाद्या व्यक्तीला मी बोगसपणे आयएएस करू शकते? यात काही तर्क आहे का? हे करण्याची शक्ती माझ्याकडे गेल्या पाच वर्षांत माझ्याकडे नव्हती. ती असती तरी मी तसं काही करणार नाही. मी यावर कायदेशीर पाऊल उचलणार नाही. इथून पुढे अशा गोष्टी सहन केल्या जाणार नाहीत", असा इशारा त्यांनी यावेळी दिला. "मी काय पाच वर्षं मंत्री आहे का? माझ्या कारखान्यांवर जप्तीच्या कारवाया होतात. मी माझ्याच अडचणींमध्ये आहे. मी या गोष्टी कोणत्या अधिकारांत करू शकते? आणि मी का करू हे?" असा सवालही त्यांनी केला.

## "महाराष्ट्रात कितीजण खासगी गाड्यांवर लाल दिवा वापरतात?"

"पूजा खेडकर चुकल्या असतील तर शिक्षा होईल. नसतील चुकल्या तर खरं-खोटं होईल. पण मग तर आता या राज्यात किती लोक, मंत्री, अधिकारी आहेत जे खासगी गाड्या वापरतात आणि त्यावर लाल दिवा लावतात? माझं तर म्हणणं आहे की यावरही एक जनहित याचिका टाकली पाहिजे. आयएएससारखी महत्त्वाची परीक्षा कुणी चुकीच्या पद्धतीने उत्तीर्ण करत असेल, तर त्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होतंय. हा स्थानिक विषय आहे की हा राष्ट्रीय विषय आहे?" असंही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

## डॉ. तात्याराव लहाने यांना मातृशोक अंजनाबाई पुंडलिकराव लहाने यांचे निधन

### माकेगाव येथे सायंकाळी अंत्यसंस्कार



परळी/प्रतिनिधी जगप्रसिद्ध नेत्र तज्ञ डॉ. पद्मश्री तात्याराव लहाने यांच्या मातोश्री अंजनाबाई पुंडलिकराव लहाने यांचे नुकतेच वृध्दपकाळाने लातूर येथे निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी ५ वा.माकेगाव , तालुका रेनापुर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने व डॉ. विठ्ठल लहाने लातूर यांच्या त्या मातोश्री होत्या. मातोश्री अंजनामांई पुंडलिकराव लहाने यांचे आज दिनांक १६ रोजी दीर्घ आजाराने लातुर येथेच उपचार दरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी ५ वा. मूळ गावी माकेगाव , ता. रेणापूर. जिल्हा लातूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात २ मुले, ४ मुली ,सुना, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. जगप्रसिद्ध नेत्र तज्ञ तसेस नेत्र शस्त्रक्रिया करण्यात जागतिक विक्रम करणारे डॉ. तात्याराव लहाने यांच्या त्या मातोश्री आहेत. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. लहाने यांच्या दुखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## खासदार बजरंग सोनवणे यांच्या पाठपुराव्यामुळे केज शहरातील नागरी वस्तीत चार रोहीत्र मिळणार

केज :- केज शहरातील वारंवारित खंडित होणारा वीज पुरवठा व कमी दाबाने कमी दाबाने होणारा विद्युत पुरवठा या नागरिकांच्या समस्यांची दखल खा. बजरंग सोनवणे यांनी घेऊन वीज वितरणचे अधिकाऱ्यांना नवीन उच्च क्षमतेच्या चार रोहीत्राचा प्रस्ताव तयार करून मंजूरीसाठी पाठविण्याचे कळविले आहे. केज शहरातील शिक्षक



कॉलनी, अहिल्या नगर, सब स्टेशन आणि दूध डेअरी या भागात अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे तसेच तो वारंवार खंडित होत असल्याने या भागातील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. दरम्यान या भागातील नागरिकांनी खासदार बजरंग सोनवणे यांची भेट घेऊन ही समस्या सोडवण्याची मागणी केली. त्या नुसार खा. बजरंग सोनवणे याची तात्काळ दखल घेत विज वितरण विभागाशी संपर्क साधून या भागातील समस्या सोडविण्यासाठी २०० के व्ही क्षमतेचे चार विद्युत रोहितत्राचे प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाला पाठविले आहेत. लवकरच चार नवीन रोहित मिळणार असल्याने या भागातील नागरिकांची विजेची समस्या कायमची सुटणार आहे.

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे आषाढी एकादशी निमित्ताने विविध कार्यक्रम

**केज/प्रतिनिधी**

बीड (प्रतिनिधी)-श्री श्री रविशंकर विद्यामंदिर पिंपरगव्हाण रोड, बीड येथे मंगळवार दि.16 जुलै रोजी आषाढी एकादशीच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवर श्री जैन सर, संस्थेचे सचिव श्री पारगावकर सर शाळेचे मुख्याध्यापक श्री हंसेसर उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांच्या उपस्थिती विविध कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते विठ्ठलाच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. विठ्ठलाची आरती व जय जय राम कृष्ण हरी या नामघोषाने सर्व वातावरण विठ्ठलमय झाले होते. इयत्ता सातवी मधील विद्यार्थ्यांनी विठ्ठल गीतावर नृत्य



सादर केले तर इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी लेझीमचे प्रात्यक्षिक सादर केले व विद्यार्थ्यांची दिंडी विठ्ठल मंदिरात नेण्यात आली. मान्यवरांनी आपल्या मनोगतामध्ये म्हटले की, पंढरपूरचा विठोबा हा अवघ्या महाराष्ट्राचे दैवत असून आषाढी एकादशीला इथे वारकऱ्यांचा मेळा भरतो. हा दिवस महाराष्ट्रात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक विठ्ठल नामाचा गजर करत पंढरपूरला पायी चालत जातात अनेक वर्षापासून चालत आलेल्या या परंपरेचा वारसा विद्यार्थ्यांना मिळावा, विद्यार्थ्यांमध्ये भक्ती भाव निर्माण व्हावा या हेतूने आषाढी एकादशीचा उत्सव शालेय स्तरावर आपण साजरा करतो यावेळी सूत्रसंचालन इयत्ता सहावीतील आदिती बडकस व श्रावणी आगळे या विद्यार्थिनींनी केले तर आषाढी एकादशीचे महत्त्व अक्षरा मस्के या इयत्ता सहावीतील विद्यार्थिनीने सांगितले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृता मॅडम, विना मॅडम , अपूर्वा मॅडम व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## दिव्य ज्योती जागृती संस्थानच्या वतीने मंगळवारी गुरूपौर्णिमा उत्सवाचे आयोजन

परळी /प्रतिनिधी दिव्य ज्योती जागृती संस्थानचे संस्थापक परमपूज्य श्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने मंगळवार दिनांक २३ जुलै रोजी हालगे गार्डन परळी वैजनाथ येथे श्री गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



मंगळवार दिनांक २३ जुलै रोजी परळी वैजनाथ येथे जागृती संस्थांचे संस्थापक श्री गुरु आशुतोषजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने हालगे गार्डन येथे दिव्य ज्योती जागृती संस्थान च्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता आरती होणार असून १० वाजता सत्संग, भजन, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमास परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन दिव्य ज्योती जागृती संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जासई विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त वारी आणि वृक्षदिंडी उत्साहात संपन्न.

**उरण/विठ्ठल ममताबादे**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज, दहागाव विभागा जासई,ता. उरण. जि. रायगड या विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त वारी, आणि वृक्षदिंडी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली. शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री ,कामगार नेते सुरेश पाटील यांच्या शुभहस्ते पालखीचे



पूजन केले गेले. त्याच्या समवेत विद्यालयाचे व्हाइस चेअरमन डी.आर. ठाकूर ,यशवंत घरत ,अमृत ठाकूर, रघुनाथ ठाकूर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग त्याचबरोबर महाराष्ट्र रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख यांनी पालखीला खांदा देऊन पालखीचे प्रयाण जासई गावात केले, विद्यालयातील सर्व विद्यार्थी पालखी समवेत ढोल ताशाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषाने पालखी फिरली. या पालखीचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी वारकरी वेषात विठ्ठल रुक्माई पोशाख करून डोक्यावर तुळशी वृंदावन व विविध प्रकारच्या वृक्ष कुंड्या घेतल्या होत्या. गावातील सुवासिनिंनी वारीतील पालखीचे पूजन करून आशीर्वाद घेतले.

# मंजूर झालेला उमापूर फाटा ते उपबाजार समीती पर्यंत रस्ता नाल्यासह तात्काळ करा-वंचित

गेवराई/प्रतिनिधी तालुक्यातील मौजे उमापूर ता.गेवराई जि.बीड येथील उमापूर फाटा ते उपबाजार समीती पर्यंतचा सिमेंट काँक्रीट रस्ता नाल्यांसह अनेक महिन्यांपासून मंजूर आहे. मात्र मंजूर असलेला रस्ता व नाल्यांसह केला नसल्याने माटेगाव, खळेगाव, कुंभेजळगाव, भाट अंतरवली या गावांना जोडणारा हा रस्ता पूर्णत: चिखलमय झाल्याने वाहने चालवतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अनेक वाहने चिखलातून सटकल्याने अनेक अपघात झाले आहेत. तसेच याच रोडवर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना व पादचाऱ्यांना पायी चालने मुश्कील झाले आहे. तर अनेक चारचाकी वाहने जात असतांना चाक पाणी साचलेल्या खड्यात गेल्यास शाळेत व कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनी यांच्या अंगावर चिखल पाणी उडण्याचे प्रकार रोजच होत आहे. मंजूर असलेला रस्ता तात्काळ करन्यात यावा. अन्यथा वंचित बहुजन आघाडी दि.२५ जुलै २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता लोकशाही मार्गाने उमापूर येथील नागरीकांना सोबत घेऊन गेवराई - शेवगाव रोडवरील उमापूर फाटा येथे रास्ता रोको करेल याची नोंद शासनाने घ्यावी असा ईशारा वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांची स्वाक्षरीने तहसिलदार मार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग बीड, जिल्हाधिकारी कार्यालय बीड, पोलिस अधिक्षक बीड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

यावेळी तहसिलदार यांना निवेदन देतांना ज्ञानेश्वर हवाले ता. प्रसिद्धी प्रमुख, राजाभाऊ पोकळे युवा नेते, यशवंत कापसे ग्रा.पं सदस्य, भारत हवाले, वसिम शेख, मुबारक शेख, देवेंद्र कापसे, रामदास मोरे,सुरेश गायकवाड उपस्थित होते.

## एकता सेवा प्रतिष्ठान'कडून गोरगरीब गरजूंना शालेय साहित्य वाटप करण्यात आले

**गुलटेकडी येथील गोरगरीब गरजूंना शालेय साहित्य वाटप करत करण्यात आले**

पुणे /पंकज भंडारी

पुणे : एकता सेवा प्रतिष्ठान व श्रीमद राजचंद्र मिशन धरमपुरच्या वतीने गुलटेकडी परिसरातील जवळपास २०० विदयार्थ्यांना शालेय साहित्य आणि बैग ,वही , कंपास पेटी , पॅट विविध महापुरुषांचे पुस्तक वाटप करण्यात आले. ईयत्ता १ पहीली ते आणि १२ वी च्या प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे देण्यात आली. हा कार्यक्रम मुंकुद नगर येथील संपोजो अश्राम येथे घेण्यात आला. यावेळी रणजीत बाफना यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना 'आई आणि बाप समजून घेताना' या विषयावर भाषण केले. प्रास्ताविक आयेजक गणेश शेरला यांनी केले.अध्यक्ष सचिन खंडागळे यांनी स्वागत केले. यावेळी संजय बोरा,डॉ प्रसाद खंडागळे,तुकाराम डुबेकर ,अभय बोरा , मारुती कांबळे ,महेश साळुंखे ,प्रदीप वर्मा पप्पु लांगे व गणेश शेरला यांच्या माध्यमातून आदीच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला



# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजने अंतर्गत अर्ज दाखल करण्याचे अवाहन

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि. 16, : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) जिल्हा कार्यालय बीड मार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असुन या योजनेसाठी मातंग समाज व तत्सम 12 पोट जातीतील सन 2023-24 या शैक्षणिक वर्षात 10 वी, 12 वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकिय व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमांमध्ये विशेष प्राविण्याने गुणवत्ता मिळवुन 60 टक्के गुण किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या विद्यार्थी, विद्यार्थीनीकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर शिष्यवृत्तीचे वितरण करण्यासाठी जास्त टक्केवारी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची गुणानुक्रमानुसार निवड मुख्यालय मुंबई यांच्याकडुन उपलब्ध निधीच्या प्रमाणात केली जाते याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. सदर योजनेचा अर्ज भरत असताना अर्जासोबत अर्जदाराचा जातीचा दाखला (सक्षम अधिकारी यांच्याकडुन घेतलेला (असावा), अर्जदाराच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार यांच्याकडुन घेतलेला असावा), रेशन कार्ड, आधार कार्ड, झेरॉक्स प्रत, गुणपत्रक, दोन पासपोर्ट साईज फोटो, बोनाफाईड / पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची पावती इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्जदाराने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, नगर रोड जिल्हा कार्यालय बीड येथे ऑफलाइन पद्धतीने बुधवार दि. 24 जुलै 2024 पर्यंत अर्ज भरावे, असे अवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.). जिल्हा व्यवस्थापक व्हि. एस. सोनवणे, यांनी केले आहे.

# प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे शाळेमध्ये रंगला रिंगण सोहळा

**सोलापूर/विश्वास चोपडे**

माढा तालुक्यातील कव्हे येथील प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे येथील शाळेत दिनांक १६/०७/२०२४ रोजी सकाळी आषाढी एकादशीनिमित्त आषाढी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून तसेच मंत्रमुग्ध करणाऱ्या नृत्याने आषाढी दिंडीला सुरुवात करून संपूर्ण ग्रामस्थांना विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घडवले.



यावेळी माऊली तुकाराम व भगवान विठ्ठलाचा जयघोष करत संपूर्ण गावातून आषाढी दिंडी मार्गस्थ होताना विद्यार्थ्यांनी फुगडी घालत दिंडीचा आनंद दुगुणित केला. फुगडीचा मोह शिक्षकांनाही नआवरल्यामुळे त्यांनीही फुगडी घालत आनंद व्यक्त केला. शाळेतील मुलींनी तुळशीचे रोपे टाळ मृदुंग वाजवत विठ्ठलाचा जयघोष करत पाऊले चालती पंढरीची वाट अशे अभंग गात दिंडी शाळेत पोचली त्या ठिकाणी शाळेच्या प्रांगणामध्ये रिंगण करून अभंग व विठ्ठलाचा जयघोष करत रिंगणाला शोभ आणली. नंतर विठ्ठलाची आरती करण्यात आली. शाळेतील संस्थेचे सचिव संजय घाडगे यांच्याकडून जेवण देण्यात आले. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक पांडुरंग यादव सर तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहमदपूर राष्ट्रीय महामार्ग ठरतोय अपघाताचे केंद्र संबंधित महामार्गाचे अधिकारी यांनी लक्ष देऊन योग्य त्या उपाययोजना करावयात- ॲड.मनोज संकाये

**परळी वैजनाथ /प्रतिनिधी**

वाहतूक महामार्ग हे प्रत्येक देशाचे ओळख असते. जे रस्ते चांगले असले की वाहतुकीस अडथळा निर्माण होत नाही. अहमदपूर राष्ट्रीय महामार्ग हा अपघाताचे केंद्र बनत चालला आहे. पिंपळा धायगुडा पासून १०० मीटर अंतरावर या महामार्गावर असंख्य मोठे खड्डे आहेत. काही रस्ता पूर्ण आहे तर काही ठिकाणी खड्डे पडले आहेत त्यामुळे तेथे अपघाताचे प्रमाण वाढवून दोन ते तीन जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. या गोष्टीचा गांभीर्यपूर्वक राष्ट्रीय



महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी विचार करण्याची गरज आहे. अपघात होऊ नये म्हणून त्वरित उपाययोजना राबवाव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड.मनोज संकाये यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे.

या राष्ट्रीय महामार्गावरून अहमदपूर नांदेड लातूर या मार्गाकडे मोठी जाड वाहतूक करणारी वाहने तसेच परिसरातील आणि अंबाजोगाई कडे येणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या महामार्गावर झालेले रोडचे काम एक बाजू पूर्ण असून दुसरी बाजू अर्धवट आहे. २०२० पासून या महामार्गाचे काम रखडले असून तेथील नागरिक काम पूर्ण होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. महामार्गावर असलेले खड्डे हे अतिशय मोठे आहेत त्याचे काम अर्धवट आहे त्यामुळे वाहनधारकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वाहनधारकांना या खड्ड्यातून जाताना तारेवरची कसरत करावी लागते. अनेक वाहनधारक तसेच मोठे वाहनांचा येथे अपघात घडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या खड्ड्यातून वाहन चालवताना समोरचे वाहन दिसत नसल्यामुळे सुद्धा अपघात झाले आहेत त्यामुळे नागरिकांच्या जीवाशी न खेळता राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालून तसेच अपघात होऊ नये म्हणून योग्य त्या उपाययोजना राबवाव्यात अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# पंकजाताई आमदार किंवा खासदार झाल्याशिवाय पायात चप्पल न घालण्याचा बडेंचा संकल्प पूर्ण.

**किल्ले धारूर/प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे ह्या आमदार किंवा खासदार जो पर्यंत होणार नाहीत तोपर्यंत आपण पायात चप्पल अथवा बुट घालणार नसल्याचा संकल्प धारुर तालुक्यातील कासारी (बोडखा) येथील भाजपाचे कार्यकर्ते ज्ञानोबा बडे यांनी केला व तो काल विधानपरिषदेच्या निवडणूकीत पंकजाताई मुंडे निवडुण आल्याने अन् आमदार झाल्याने तो संकल्प पुर्ण झाला आहे.त्यांनी दि. 24/10/2023 विजयादशमी (दसरा) या उत्सवापासुन ते आजपर्यंत ते पायात चप्पल न घालता अनवाणी फिरत असुन ज्यावेळी पंकजाताई मुंडे खासदार किंवा आमदार होतील,तेव्हाच पायात चप्पल घालणार असल्याचा संकल्प भाजप युवा मोर्चाचे धारूर तालुका उपाध्यक्ष तथा कासारी ग्रा.पं. व सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य ज्ञानोबा बडे यांनी केला होता. पंकजाताई आता आमदार झाल्याने खुप आनंद झाला असुन पंकजाताईच्या उपस्थितीतच त्यांच्या हस्ते चप्पल घालणार असल्याचेही ज्ञानोबा बडे यांनी म्हटले आहे. पंकजाताई मुंडे यांच्यावर अनेक कार्यकर्ते निष्ठा व निस्वार्थी प्रेम करत असून अनेकांनी पंकजाताई यांचे राजकीय पुनर्वसन होण्यासाठी देव पाण्यात ठेवले होते असेच धारुर तालुक्यातील कासारी (बोडखा) येथील रहिवाशी भाजपाचे युवा नेते ज्ञानोबा बडे



यांनी पंकजाताई मुंडे खासदार किंवा आमदार झाल्याशिवाय पायात चप्पल न घालण्याचा संकल्प केला होता तो पुर्ण झाला. ज्ञानोबा बडे हे कासारीचे भूमिपुत्र स्व. महादेव अण्णा बडे यांचे कट्टर समर्थक असुन ते भाजपात असल्याने हे ही पहिल्यापासुनच भाजपचे व मुंडे घराण्याचे कट्टर समर्थक आहेत. ते पंकजाताई मुंडे यांचे कट्टर समर्थक म्हणुन परिसरात ओळखले जातात. गत विधानसभा निवडणुकीत ताई पराभूत झाल्या त्यामुळे गेल्या पाच वर्षात पंकजाताई यांच्याकडे कोणतेही पद नाही. त्यामुळे पंकजाताई या आमदार किंवा खासदार व्हाव्यात. अशी प्रार्थना नवरात्र उत्सवादरम्यान विजयादशमी दसरा ज्ञानोबा बडेंनी आई तुळजाभवानी चरणी केली. जो पर्यंत पंकजाताई या आमदार किंवा खासदार होत नाहीत तोपर्यंत आपण पायात चप्पल न घालता अनवाणी चालणार असल्याची शपथ ही बडे यांनी घेतली. ज्यावेळी ताई विजयी होऊन लोकप्रतिनिधी होतील तेव्हाच आपण पायात चप्पल घालु अशी ही शपथ त्यांनी घेतली होती. तेव्हा पासुन ते आजतागायत ते अनवाणी पायाने फिरत आहेत. कडक उन्हाळ्यात ही ते अनवाणी चालत होतो. ही प्रार्थना आई तुळजाभवानींनी पूर्ण केली असुन तो दिवस काल उजाडला. विधानपरिषदेच्या निवडणुकीत पंकजाताई मुंडे विजयी झाल्या आता त्यांच्या उपस्थितीतच एक कार्यक्रम घेऊन त्यांचा सत्कार करून आपण त्यांच्या हस्ते पायात चप्पल घालणार असल्याचे ज्ञानोबा बडे यांनी सांगितले.

## राज्यातील महसुल कर्मचारी संघटनेचा विविध मागण्यांसाठी बेमुदत संप.

**किल्लेधारूर/प्रतिनिधी**

राज्यातील महसुल कर्मचा-यांचे विवीध महत्वपुर्ण मागण्यासाठी दि. 15 जुलै पासून महसुल कर्मचारी संघटनेने बेमूदत संप पुकारला असून सर्व कर्मचा-यांनी या संपात सहभागी होऊन संप यशस्वी करावा असे अवाहण महसुल कर्मचारी संघटनेचे प्रकाश गोपड यांनी केले आहे. राज्यातील महसुल कर्मचारी यांच्या विवीध प्रश्नावर महसूल कर्मचारी संघटना सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करत असताना वेळोवेळी आंदोलन करूनही प्रशासन लक्ष देत नसल्याने महसूल कर्मचाऱ्यांची महत्वपूर्ण मागणी जुनी पेन्शनची आहे. तसेच महसूलचा सुधारित आकृतिबंध लागू करण्यात यावा. राज्यातील महसूल विभागात अव्वल कारकून-मंडळाधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार या पदावर पदोन्नती आदेश निर्गमित करावे. महसूलसाठी एक परीक्षा पद्धती लागू करताना महसूल सहायकांचा ग्रेड-पे २४०० रुपये करावा आदी मागण्यासाठी दि. 15 जुलै पासून महसुल कर्मचारी संघटनेने बेमूदत संप पुकारला असून या संपात कर्मचा-यांनी सहभागी होऊन संप यशस्वी करावा असे आवाहन महसुल कर्मचारी संघटनेचे नेते प्रकाश गोपड यांनी केले

## वडझरी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकपदी श्रीमती विनिता भीमराव बांगर यांची नियुक्ती

**पाटोदा /प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील मातोश्री सेवाभावी संस्था संचलित संत शिरोमणी भगवान बाबा प्राथमिक आश्रम शाळेतील शालेय पोषण आहार योजनेतील अनियमितता व गैरव्यवहार शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९,२०१९-२०,२०२०-२१ कालावधीत प्रकरणात सदरील शाळेतील कर्मचारी धनंजय सानप आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शिक्षण विभागाकडे तक्रार केली होती.त्या अनुषंगाने शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या स्तरावरून चौकशी करून अहवाल सादर केल्यानंतर संबंधित मुख्याध्यापक प्रवीण लिंबाजी वनवे यांना निलंबित करण्याचे आदेश दि.०५ जुन २०२४ रोजी कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन अजित जगताप यांनी दिले होते.त्या अनुषंगाने


सदर शाळेतील सेवाजेष्ठता यादीनुसार मुख्याध्यापक म्हणून मान्यता मिळण्याबाबतचे पत्र सहाय्यक आयुक्त संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड यांनी प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजी नगर यांना पत्र क्र. ८१२ दि. ११ जुलै २०२४ च्या पत्रानुसार कळविले होते. त्या पत्रानुसार प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहूजन कल्याण प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी श्रीमती विनिताबाई भीमराव बांगर यांना शाळेचे प्रशासकीय व दैनंदिन कामकाज सुरळीत चालवण्यासाठी त्यांचे मूळ कामकाज सांभाळून अतिरिक्त मुख्याध्यापक पदाचा कार्यभार दिनांक १५.१०.२०२४ पर्यंत देण्यात आलेला आहे. तदनंतर संस्थेच्या आश्रम शाळेतील सेवा जेष्ठ शिक्षकाचा कायम मुख्याध्यापक पदाचा परिपूर्ण प्रस्ताव प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात सादर करण्यात यावा. असे आदेश प्रादेशिक उपसंचालक यांनी दिनांक १५ जुलै २०२४ रोजी सहाय्यक संचालक इतर मागास बहूजन कल्याण बीड यांना दिलेले आहेत. याप्रकरणी शाळेतील सहशिक्षक धनंजय सानप व त्यांच्या सहकाऱ्यांनी शासन दरबारी वारंवार पाठपुरावा केला होता.अखेर निलंबित मुख्याध्यापक प्रवीण वनवे यांच्या जागी श्रीमती विनिता बांगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## श्री बजरंग बली वेताळ मंदिर येथे रविवारी गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन

## भाविक भक्तांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा-श्री विलासनंदजी महाराज

**परळी /प्रतिनिधी**

श्री बजरंग बली वेताळ मंदिर येथे रविवार दिनांक २१ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदिराचे महंत श्री विलासनंदजी महाराज यांनी दिली आहे. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी पंचम ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैजनाथ मंदिर जवळ असलेले श्री बजरंग बली वेताळ मंदिर येथे रविवार दिनांक २१ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दुपारी बारा वाजता श्रींची महाआरती होणार आहे. तसेच दिवसभर धार्मिक कार्यक्रम होणार असून दुपारी एक वाजता महाप्रसाद वितरण होणार आहे. या कार्यक्रमास परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री बजरंग बली वेताळ मंदिराचे महंत श्री विलासनंदजी महाराज यांनी केले आहे.



## एम.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल सासवडचा पालखी सोहळा



**सासवड प्रतिनिधी** :आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर एम.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल सासवड प्रशालेतील विद्यार्थ्यांचा पालखी सोहळा आज संत सोपानकाका मंदिरामध्ये उत्साहात साजरा झाला. प्रमुख पाहुणे ह.भ.प. स्वप्निल महाराज काळाने व प्रशालेच्या मा. मुख्याध्यापिका कल्पना नागनूर यांच्या हस्ते पालखी व संतरूपी बालचमुंचे पूजन करण्यात आले. यावेळी छोट्या गटापासून ते आठवीच्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी तालासुरात अभंग,भजन गायन केले. तसेच काहींनी विठ्ठल प्रेमाचा भाव व्यक्त करणारे नृत्य व मनोरे सादर केले. त्यामुळे सर्व वातावरण भक्तीमय झाले होते.

मा.मुख्याध्यापिका कल्पना नागनूर मॅडम यांनी आपल्या प्रास्ताविकात पालखी सोहळ्याचे महत्त्व पटवून दिले. तर प्रमुख पाहुणे ह.भ.प.स्वप्निल महाराज यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात विद्यार्थ्यांना छोट्या छोट्या उदाहरणातून जीवनमूल्य सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली रुचिरा गार्डी व निकिता होले तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. भाऊसाहेब येळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## श्री अश्वलिंग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी संपन्न...

**पिंपळवंडी /प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.अश्वलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी या वर्षी आगळावेगळा उपक्रम राबवून आषाढी एकादशी प्रित्यर्थ दि.१६ जुलै २०२४ मंगळवार रोजी विद्यार्थ्यांची पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले होते. आषाढी वारी निमित्त महाराष्ट्रातील सर्वच पायी दिंड्या पंढरीच्या पांडुरंगाच्या भेटीसाठी पंढरपुरात पोहचल्या आहेत.हातात भगवी पताके,टाळ



मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा माऊली तुकाराम व विठुरायाच्या भजनाच्या नाम घोषात ही दिंडी शाळेपासून गावातील प्रमुख रस्त्यावरुन गावात काढण्यात आली होती. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची वेशभूषा परिधान केली होती. डोक्यावर तुळशीवृंदावनचाही समावेश होता.या दिंडीचे ठिकठिकाणी महिलांनी स्वागत केले.शिक्षक व विद्यार्थ्यांनी फुगडीचा आनंद लुटला.या पायी दिंडीत इयत्ता ५ वी ते १२ पर्यंतचे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी सह मुख्याध्यापक भोसले सर तसेच तोतरे सर,जरे सर,शिंदे सर,बडे सर,अभिषेक पवार सर,प्रा.तरटे सर,प्रा.बोडखे सर,प्रा.अशोक पवार सर,प्रा.शाम पवार सर,प्रा.वाघुले सर.श्रीमती ठाणगे मॅडम,शेखर पवार,जानू मामा,अशोक मामा,सुरेश पवार,वाळके मामा सहभागी झाले होते.

## अंबाजोगाईतील महिलेचा दिंडीत हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**अंबाजोगाई /प्रतिनिधी**

शहरातील विवेकानंद नगर, परळी रोड परिसरातील उषा अशोक विर्धे यांचा आळंदी ते पंढरपूरच्या दिंडीत पायी वारीत असताना लोणंद जवळील एका खाजगी रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. मृत्यू समयी त्या ६४ वर्षांच्या होत्या. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत प्राप्त माहिती अशी की, पुणे येथिल डेक्कनच्या खंडोबा दर्शन दिंडी क्रमांक दोन मधून



उषा विर्धे, त्यांचे पती अशोक विर्धे आणि नातेवाईक हे आळंदी ते पंढरपूर या दिंडीमध्ये पाई वारी करत होते. माळशिरस येथे दिंडी आली असता त्यांना दुखणं आलं, त्यांना लोणंद येथील साई हॉस्पिटलमध्ये अधिक उपचारासाठी दाखल केले असता तेथे त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात त्यांचे पती अशोक विर्धे, दोन विवाहित मुलं, विवाहित मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. श्रीयुत अशोक विर्धे जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. उषा विर्धे यांच्या पार्थिवावर अंबाजोगाई येथील रविवार पेठ परिसरातील बोरुळ तलावाच्या स्मशानभूमीत रविवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील नागरिक आणि नातेवाईक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कृषी पंढरी महोत्सव प्रदर्शनाचे उद्घाटन



## कृषी प्रदर्शने हे शेतकऱ्यांना या क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाची माहिती मिळण्यासाठी उपयुक्त-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**पंढरपूर/प्रतिनिधी**

कृषी प्रदर्शनामधून शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात आलेल्या नवनवीन तंत्रज्ञान तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यास मदत होते हे नवीन तंत्रज्ञान आपल्या शेतात वापरून त्यातून भरघोस उत्पादन शेतकरी घेतात व त्यांची आर्थिक उन्नती घडून येते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी अशी नवतंत्रज्ञानाची माहिती देणारी कृषी प्रदर्शने उपयुक्त ठरतात, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. कृषी उत्पन्न बाजार समिती व पांडुरंग प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात आयोजित 'कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक कृषी महामहोत्सव-कृषी पंढरी २०२४'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत परिचारक, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, कृषी सहसंचालक रफीक नायकवडी,जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीष गायकवाड, उपसभापती राजुबापु गावडे आदी उपस्थित होते.

शासकीय योजनांच्या लाभापासून एकही लाभार्थी वंचित राहू नये समाजातील सर्व घटकांना न्याय देण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने घेण्यात आलेले विविध निर्णय, योजनांमुळे त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे काम होते, त्यामुळे सर्व सामान्यापर्यंत या योजना पोहचविण्याचे काम प्रशासनाने अचूकपणे करावे; समाजातील सर्व घटकाला याचा लाभ देण्याबरोबरच एकही पात्र व्यक्ती या योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वावलंबनाला चालना राज्याच्या विकासाकरीता समाजातील सर्व घटकांसाठी विविध योजनांचा समावेश करुन त्यांना लाभ देण्यात येत आहे. हे सरकार शेतकऱ्याचे, वारकऱ्यांचे कामगारांचे, कष्टकऱ्यांचे आणि सर्व सामान्यांचे आहे. राज्यशासनाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने'अंतर्गत

### शेतकरी वर्गाच्या कल्याणाकरीता शासन प्रयत्नशील

**शेतकरी आपला मायबाप, अन्नदाता, लाखांचा पोशिंदा आहे, शेतकऱ्यांचे दु:ख व वेदना जाणून घेण्याबरोबरच त्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शासनामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामध्ये अतिवृष्टी, अवकाळी, गारपीट या नुकसानीच्या क्षेत्राची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करुन राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा अधिक दराने मदत, या अंतर्गत मागील दोन वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी १५ हजार कोटी रूपयांची मदत देण्यात आली. मागेल त्याला सौरउर्जा पंप- शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जीकरण, 'एक रुपयात पीक विमा योजना, नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत १२ हजार रुपये देण्याचा निर्णय, शेतकऱ्यांना वीज देयकात माफी, ठिंबक सिंचन, दुधाच्या अनुदानात पाच रुपयांची वाढ, बांबु लागवडीकरीता हेक्टरी ७ लाख रुपयांचे अनुदान, बेदाणाचा शालेय पोषण आहारात समावेश, दिवसा वीज देण्याचा निर्णय असे विविध लोककल्याणकारी योजनेच्यामाध्यातून सुमारे ४४ हजार कोटी रुपयांची शेतकऱ्याला मदत करण्यात येत आहे. केंद्रशासनाच्या निगडीत प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी राज्य व केंद्र शासन मिळून काम करत आहे. या वर्षीचा महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मिळाला आहे.**

### राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे सर्व सामान्य व्यक्तीच्या जीवनात परिवर्तन

महिलांना १ हजार ५०० याप्रमाणे वर्षाला १८ हजार रुपयांचा लाभ देण्यात येणार असून या योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या खात्यात लवकरच रक्कम जमा करण्यात येणार आहे. अन्नपूर्णा योजनेंतर्गत वर्षाला तीन मोफत गॅस सिलिंडर देण्यात येणार आहे. शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित, अशासकीय महाविद्यालये अशा शैक्षणिक संस्थेत विद्यार्थिनींना शैक्षणिक व परीक्षा शुल्क १०० टक्के माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. युवकाच्या हाताला रोजगार देण्याचे काम सुरु युवा अप्रेंटिसशीप योजनेंतर्गत १२ वी उत्तीर्ण, पदविकाधारक आणि पदवीधर विद्यार्थ्यांना अनुक्रमे ६ हजार, ८ हजार आणि १० हजार दरमहा विद्यावेतन देण्यात येणार आहे. तरुणांना रोजगार तसेच उद्योजकाला कुशल मनुष्यबळ मिळण्यास मदत होणार आहे, असे श्री. शिंदे म्हणाले. यावेळी माजी आमदार श्री. परिचारक यांनी आपले मनोगत व्यकत केले. प्रारंभी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी फिट कापून प्रदेशाचे उद्घाटन केले. त्यानंतर प्रदर्शनातील विविध दालनांना भेटी देवून पाहणी करून समाधान व्यक्त केले. या प्रदर्शनात एकूण २०० स्टॉल्स उभारण्यात आले असून त्यापैकी शासकीय विभागाचे ५०, महिला बचत गटचे १५ स्टॉल आहेत. इतर महामंडळ, शेतकरी उत्पादक कंपनी, मिलेट उत्पादने, प्रक्रियायुक्त पदार्थ, सेंद्रीय व औषधी पदार्थ, बियाणे खते औषधे कंपनी, ठिबक व तुषार सिंचन उत्पादक,कृषी यांत्रिकीकरण आणि गृहोपयोगी वस्तुंचे स्टॉल्स आहेत. कृषी पंढरी या प्रदशनाला हजारो शेतकरी, वारकरी व नागरिकांनी भेटी दिल्या.

## मालशिरस येथील लिंबाचीवाडी ,पाटीलवस्ती याठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**सासवड प्रतिनिधी:**

माळशिरस ग्रामपंचायतीच्या वतीने महिला व बालकल्याण निधीमधून प्राथमिक शाळा माळशिरस, लिंबाची वाडी, पाटील वस्ती येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले .याप्रसंगी माळशिरस ग्रामपंचायत च्या विद्यमान सरपंच आरती यादव, उपसरपंच अशोक( बाप्पू )यादव ,पुरंदर तालुका युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष माऊली यादव ,माजी सरपंच सदाशिव बापू डोंबाळे, ग्रामसेवक बडदे भाऊसाहेब, ग्रामपंचायत सदस्य शरद यादव, दीपक यादव, ग्रामपंचायत सदस्य सविता गद्रे, विठ्ठल आप्पा इंदलकर, भाऊसाहेब यादव ,दीपक बोरावके, विजय कामठे, बाबासाहेब बोरावके, नवनाथ यादव ,अमीर मुलानी, सचिन बोरकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्कार मिळाल्याबद्दल सखाराम पोहिकर यांचा धारुर येथे सत्कार...



**धारूर /प्रतिनिधी**

दि,१६ अहमदनगर येथील माऊली संकुलन सभागृह येथे क्रुषी दिनाचे औचित्य साधून गेवराई तालुक्यातील गढी येथील सामाजिक कार्यकर्ते ग्रामपंचायत सरपंच विकास समिती प्रदेश उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे गेवराई तालुकाध्यक्ष पत्रकार सखाराम पोहिकर यांना सरपंच सेवा संघाच्या वतीने राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्काराने सन्मानपत्र सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आल्याबद्दल महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाच्या वतीने धारुर या ठिकाणी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला यावेळी तालुकाध्यक्ष मा. सिध्दार्थ देशमाने उपाध्यक्ष साळीकराम करे अशोक खांडेकर सचिव महारुद्र मुंडे सहसचिव ज्ञानेश्वर भारती सदस्य इंद्रान कुरकटे जीजाराम सरवदे बाबुराव शिंदे बाबुराव शिंदे शिवरत्न बनसोडे प्रदीप मुंडे कलीम शेख आयुब शेख निलेश मस्के भागवत बडे शिवाजी कांबळे परमेश्वर बडे इत्यादी उपस्थित होते

# नारीशक्ती ॲप ऐवजी स्वतंत्र संकेतस्थळाची शासनाने व्यवस्था करावी- अँड.मनोज संकाये

**परळी/प्रतिनिधी**

मध्यप्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. महायुतीच्या सरकारची महत्वकांक्षी असलेली ही योजना नारीशक्ती ॲप मध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे महिलांना ऑनलाइन फॉर्म भरताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामध्ये माननीय जिल्हाधिकारी तसेच परळी तहसील कार्यालयाचे तहसीलदार यांनी मार्ग काढावा आणि महिलांची होणारी धावपळ थांबवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केली आहे.

नारीशक्ती ॲपद्वारे हा फॉर्म न भरताना त्यासाठी महाराष्ट्र सरकारने स्वतंत्र सांकेतिक स्थळ(वेबसाईट)ची सुविधा महिलांना उपलब्ध करून द्यावी. सध्या ऑनलाईन फॉर्म



भरण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्राबाहेर महिलांची असंख्य गर्दी होत आहे परंतु दिवसभर थांबून सुद्धा फॉर्म भरल्या जात नाही. सेतू केंद्र चालकांना विचारणा केली असता नारीशक्ती ॲप मध्ये डॉक्युमेंट अपलोड होण्यास वेळ लागत आहे कधीकधी फॉर्म ॲप मधून बाहेर फेकला जातो असे त्यांचे म्हणणे आहे. सरकारची महत्वकांक्षी असलेली योजना ही लाडक्या बहिणी पर्यंत पोहोचवायची असेल तर त्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळाची शासनाने निर्मिती करावी आणि लाडक्या बहिणींची होणारी धावपळ आणि पायपीट थांबवावी त्यासाठी जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांनी लक्ष देऊन या ॲप अंतर्गत येणाऱ्या अडचणी सरकारच्या निदर्शनास आणून द्याव्यात अशी मागणी त्यांनी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077